Vol-13 Special Issue- 1.2 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# विश्वकुटुंबातील शांतीसाठी सांप्रदायिक सद्भाव आवश्यक

**प्रा.डॉ. कोमल ठाकरे**
अधिष्ठाता मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर अमरावती

विश्वशांतीसाठी सांप्रदायिक सद्भाव आणि सामाजिक शांतता ही आज काळाची गरज आहे. स्वामी विवेकानंदांना अभिप्रेत असलेला धर्म या शब्दाचा खरा अर्थ म्हणजे आपल्या आई-वडिलांच्याप्रती, कुटुंबाप्रती,समाजाप्रती, देशाप्रती व सर्व जगाप्रती असलेले आपले कर्तव्य पाळणे म्हणजेच वसुधैव कुटुंबकम या धर्माच्या व्यापक व्याख्येला अंतकरणात कायम रुजविणे होय. आपल्या जीवनात जाती-धर्माच्या व देशाच्या सीमा ओलांडून मानवी कल्याणाचे कार्य करणारे संत, सुधारक, प्रतिभावंत यांनी खऱ्या अर्थाने देशाला खरा धर्म पटवून दिलेला आहे. आपल्या देशात नेहमीच ज्ञानाची व सत्याची पूजा केल्या गेली आणि म्हणूनच सत्यमेव जयते, नही ज्ञानेन सदृश्यम पवित्रम इह विद्यते व वसुधैव कुटुंबकम ही भारत देशाची ब्रीदवाक्य म्हणून ओळखली जातात. म्हणूनच सांस्कृतिक भावनेतून संपूर्ण जगाला शांतीचा मार्ग दाखवण्याची शक्ती आपल्या देशात आहे हे निर्विवाद सत्य आहे. विश्वशांतीसाठी संपूर्ण जगात सद्भाव समन्वय व शांतता नांदावी यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकांच्या मनात ही सद्भावना निर्माण होणे अत्यंत आवश्यक बाब आहे.

## धर्म व त्याचे स्वरूप

विश्वशांती हे मानवाच्या वैश्विक वृत्तीचे इप्सित आहे. इतर प्राण्यांपेक्षा आपण वेगळे असण्याची आणि आपल्या अर्थपूर्ण अस्तित्वाला असणाऱ्या वेगळ्या जाणीवेची, आपल्या उत्क्रांत रूपाच्या साक्षात्काराची जी जाणीव आपल्यात आहे तिच्याच तळाशी विश्वशांतीच्या कल्पनेची बीजे दडलेली आहेत. संत तुकारामाच्या उक्तीप्रमाणे, 'आकाश मंडप, पृथ्वी आसन, मन रमे तिथे, क्रीडा करी' व्यक्ती आणि समाज चिरंतनपणे निर्वेधरीतीने या पृथ्वीतलावर नांदत राहावा हे कुठल्याही बुद्धिमान माणसाच्या निरामय मनाचे आद्य स्फुरण आहे. या संदर्भातील मानवाच्या चिरंतन श्रद्धेतून संप्रदायाची आणि धर्माची निर्मिती झाली. 'धारणात धर्ममित्याहु' ही वनपर्वातील धर्मराजाने केलेली व्याख्या किंवा 'यतो अभ्युदय नि:श्रेयस सिद्धी स:धर्म' ही वैशेषिकांनी केलेली व्याख्या समाजाच्या लौकिक आणि पारलौकिक विकासाची, त्यांच्या धारणेची आणि शांतीचीच अपेक्षा स्पष्ट करणारी अशी आहे. धर्माची निश्चित आणि काटेकोर व्याख्या जरी करता येत नसली तरी त्या अंतर्गत असणाऱ्या तत्त्वज्ञानात, त्यांच्या आचार-विचार, उपासना पद्धतीत विभिन्नता असली तरी त्यांचा मूळ हेतू हा विश्वकल्याणाचाच असतो. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी, 'निसर्गातील अत्यंत पवित्र, संपूर्ण मानवी भवितव्याशी संबद्ध जीवन व विश्व अथवा निसर्ग यांची नियंत्रक अशा अलौकिक शक्तीवर माणसाची श्रद्धा असते. त्या शक्तीचा स्वतःशी अनुकूल, पवित्र व घनिष्ठ संबंध स्थापित करणारी वैयक्तिक अथवा सामाजिक मनःप्रवृत्ती व त्यातून निघणारी आचरणाची पद्धती म्हणजे धर्म होय'. अशा निसर्गातील शक्तीविषयी मानवी मनात कुतूहल, भय, प्रेम आणि श्रद्धा असली तरी त्यात निरपेक्षता असते. त्या शक्तीसमोर श्रद्धा असणारी माणसं सदैव नतमस्तक होत असतात. धर्मकल्पनेने एक प्रकारची शरणागतता त्यांच्यात निर्माण झाली असली तरी त्यात व्यक्तिगत आणि सामूहिक कल्याणाची अपेक्षाही तितकीच असते. त्या शक्तीशी समरस होऊन मानवी जीवनाचे कल्याण करण्याकरिता व्यक्तिशः आणि सामूहिक रीतीने त्या धर्मातील लोकांची उपासना सुरू असते. जगातील हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध या धर्माच्या तत्त्वज्ञानाला गृहीत धरून लक्ष्मणशास्त्री जोशी लिहितात, 'जीवन परिपूर्ण आणि कृतार्थ करणारी हे अपरिपूर्ण, दोषमय, अशांत जीवन बदलून टाकणारी उच्चतम ध्येयाच्या आणि दिव्यत्वाच्या प्राप्तीची पद्धती म्हणजे धर्म होय. त्या ध्येयातच

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

शाश्वत सत्य असते असे उच्च धर्म मानतात. एकेश्वरवादी धर्माच्या अनुसार परमपवित्र ईश्वर, अद्वैतवादाप्रमाणे परमात्मा आणि प्राथमिक बौद्ध धर्माप्रमाणे निर्वाण म्हणजे शाश्वत सत्य व उच्चतम ध्येय होय'.

## धर्मभेद

मूलतः मानवी कल्याणासाठी निर्माण झालेल्या धर्माचे माहेरघर हे भारत आहे. हिंदू, इस्लाम, ख्रिस्ती, शीख, बौद्ध, जैन, पार्शी अशा जवळजवळ सात धर्माचे लोक शेकडो वर्षापासून भारतात नांदत आहेत. धर्मनिरपेक्षतेच्या आधारावर भारताचा सर्वांगीण विकास व्हावा, सर्व धर्मातील लोकांना समान, न्याय्य वागणूक मिळावी, आपल्या धर्माची आणि संस्कृतीची जोपासना सर्वांना सहज सुलभपणे करता यावी अशी तरतूद संविधानात करण्यात आली आहे. धार्मिक निकषांवरून राज्यशासन कोणताही भेदभाव करणार नाही याची हमी देण्यात आली आहे. संपूर्ण विश्वाने भारताकडे आदराने पहावे असा हा लोकशाहीप्रधान देश आहे. तो धर्मशाही मानणारा देश नाही. विद्यमान परिस्थितीमध्ये आपल्या देशाचा प्रवास अतिशय अस्वस्थ करणाऱ्या वर्तमानातून जात आहे. स्वातंत्र्योत्तर काळात विविध धर्म संप्रदायामध्ये दरी वाढत गेली. भारताच्या फाळणी दरम्यान हिंदू मुस्लिमामध्ये दंगली माजल्यात, भारत पाकिस्तान यांच्यात युद्ध झाली. काश्मीरमध्ये हिंसाचार घडला. सुवर्ण मंदिरातील कारवाई, खलिस्तानची चळवळ, राजकीय लोकांच्या झालेल्या हत्या, मुंबई आणि संसदेवरील हल्ला या आणि अशा अनेक भीतीच्या दहशतीच्या वनव्यात गेली ७५ वर्षे भारत अक्षरशः होरपळून निघाला आहे. विश्वातील वाढत्या दहशतवादाने सांप्रदायिक सद्भाव निर्मितीच्या प्रक्रियेत मोठी अडचण निर्माण केली आहे. भारतात दहशतवादी कारवायात गुंतलेले बहुतांश अतिरेकी हे मुस्लिम असल्यामुळे त्यांचे संबंध पाकिस्तानसारख्या शत्रुराष्ट्राशी सिद्ध झाल्यामुळे भारतातील बहुसंख्य हिंदूंच्या मनात हे हल्ले केवळ पाकिस्ताननेच घडून आणले व त्यामागे केवळ भारतद्वेषच नाही तर इस्लामी सत्तेचे रक्षण, संवर्धन हे धोरण आहे. या गृहीतकामुळे दहशतवाद्यांविरुद्ध बहुसंख्यांकाची प्रतिक्रिया येत नाही तर हे दहशतवादी इस्लामधर्मीय असल्यामुळे मुस्लिमांविषयीचा संताप व द्वेषाची भावना जन्माला येते. ती वाढीला लागते आणि त्याची झळ सामान्य इस्लाम लोकांना लागते.

## दहशतवाद

तथापि एक गोष्ट आपल्या लक्षात येते की, गेल्या वीस वर्षात दहशतवादाचे जेवढे हल्ले भारतात झाले तेवढेच भारताबाहेरही झाले आहेत. अफगाणिस्तान, पाकिस्तान, लिबीया, इराण, इराक, सुदान, इजिप्त या अशा अनेक देशात दहशतवादाची केंद्र आहेत. पण त्यामागे केवळ इस्लामिक धर्मवाद नसून इतरही गोष्टी कारणीभूत आहेत. आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या दहशतवादाची मुळे शोधण्याचा प्रयत्न केला तर त्यामागे अमली पदार्थाचा व्यापार, शस्त्रांचा काळाबाजार, राजसत्ता बळकावण्यासाठी चाललेली कटकारस्थाने अशी अनेक कारणे आहेत. म्हणून कोणत्याही देशातील दहशतवादी हल्ल्यामागे केवळ धर्मवाद आहे असे समजणे म्हणजे त्या देशातील त्या धर्माविषयी द्वेषभावनेचे बिजारोपण करणे हे पूर्णतः चुकीचे आहे. दहशतवाद धार्मिक कमी आणि राजकीय, आर्थिक अधिक आहे. ही गोष्ट जर समजून घेतली तर त्यानिमित्ताने परस्परद्वेष निर्माण न होऊ देता त्याविरुद्ध सर्व धर्मीयांनी एकजुटीने लढून शांतता प्रस्थापित करण्याच्या धोरणाला कृतिशील रूप देता येईल. अशापद्धतीने विचार करणाऱ्या विचारवंतांची संख्या देशात फार कमी आहे. त्यामुळे दहशतीमागील मूळ कारणांचा सुबुद्धपणे शोध घेता न आल्यामुळे आपला देश अधिकाधिक भयग्रस्त होत चालला आहे. आपल्या देशातील जातीयता आणि धार्मिकता या आधारावर निवडणुका होत असल्यामुळे निवडणुका जवळ आल्या की, त्यातील आपपर भावाला चांगलेच खतपाणी मिळते. विशिष्ट समाजातील लोकांची मते मिळवण्यासाठी सर्वच पक्ष सरळसरळ व्यक्तीगत स्वार्थाचा विचार करीत असतात. यातूनच जातीय वैमनस्याची परात्मभावना निर्माण होते. अशा अविश्वासाच्या भावनेचा अतिरेक झाला की, माणसामध्ये परस्पराविषयी द्वेष निर्माण होतो. खूनशी वृत्ती निर्माण होते. त्यातूनच तो शेवटी शस्त्र हातात घेतो आणि त्याची परिणती विध्वंसात होते. अशी उदाहरणं आपल्याला अनेकदा अनुभवायला मिळतात. आपल्या देशात सात धर्माचे लोक राहतात. त्यापैकी हिंदू आणि

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

मुसलमान यांच्यातील धार्मिक ताणतणाव जेवढा जास्त असतो तेवढा इतर कुठल्या धर्मात फारसा आढळत नाही. स्वातंत्र्याच्या आधी, स्वातंत्र्य चळवळीच्या काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातही प्रसंगानुरूप हा तणाव निर्माण झालेला दिसून येतो.

## धर्मभेदाचे कारण

भारतीय संविधानात सर्व धर्माच्या सुरक्षिततेची हमी देण्यात आलेली आहे. धार्मिक निकषांवरून कोणत्याही व्यक्तीच्या जगण्याच्या संदर्भात भेद नाकारता येत नाही. भारतीय संविधानात भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य म्हणून उल्लेख करण्यात आला आहे. तो लोकशाहीशी बांधिलकी असणाऱ्या प्रबुद्ध जनतेला आणि राजकीय पक्षांना मान्य आहे. असे असूनदेखील दोन विभिन्न धर्मीय लोकांमध्ये सातत्याने तणाव निर्माण होऊन सामाजिक शांततेचा भंग का होतो? याचा विचार अंतर्मुख होऊन करण्याची आवश्यकता आहे. बहुसंख्य असणाऱ्या धर्मीयांच्या मनात अहंगंडाची भावना निर्माण झाली तर आपल्या स्वतःत अतिरिक्त अधिकाराची जाणीव निर्माण होते. त्या तुलनेत घटनादत्त अधिकार समान असतानाही अल्पसंख्यांक धर्मीय लोकांच्या मनात असुरक्षितेची भावना वाढीला लागते. त्यामुळे धार्मिक तणाव निर्माण होत असतो. तसेच अल्पसंख्याकांना सरकारी नोकरीत पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही, आरक्षण मिळत नाही, हे त्यांच्या क्षोभाचे कारण ठरत असते. तसेच धार्मिक अनुयायांच्या निर्माण झालेल्या विविध संघटनाकडून मर्यादा ओलांडून होणारी वक्तव्य आणि कृती अनेकदा धार्मिक दंगली घडविण्यासाठी कारणीभूत ठरत असतात. धर्माशी भाषांचे संबंध जोडल्यामुळे भाषा प्रश्नावरुनही धार्मिक सलोख्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत. उत्तर प्रदेशात उर्दूला जोड भाषेचा दर्जा मिळावा म्हणून होणारे आंदोलन किंवा पंजाबी भाषिकांचे, शिखांचे वेगळे राष्ट्रच असावे म्हणून निर्माण झालेली चळवळ ही भाषा प्रश्नापेक्षा धार्मिक प्रश्नांमुळे अधिक फोफावताना दिसते. भारतात हिंदू, मुस्लिम कित्येक शतकापासून एकत्र असतानाही त्यांच्यात आंतरिक एकता का निर्माण झाली नाही? याचे कारण हिंदू विचारधारा व इस्लाम यांच्यात बौद्धिक समन्वय होऊ न शकल्यामुळे भारतीय मुस्लिमांची हानी झाल्याचे हुमायू कबीर यांनी म्हटले आहे. तसेच भारताच्या प्राचीन इतिहासाचा स्वीकार भारतीय मुस्लिमांनी न केल्यामुळे मुसलमानांचा सांस्कृतिक वारसाही कमकुवत झाला. याबरोबरच भारतीय मुस्लिम दुसऱ्या देशातल्या, दुसऱ्या धर्माच्या अनुयायांशी ज्या प्रेमभावाने मैत्रिने वागतात तीच मैत्री भारतीय देशबांधवांशी ठेवली असती तर आपल्या देशातील दोन धर्मात समन्वय आणि ऐक्य निर्माण झाले असते. तसेच आपल्या देशातील हिंदूसुद्धा बौद्धिक समन्वयाच्या अभावी इस्लामच्या तत्त्वाविषयी अज्ञानी राहिलेत. त्यामुळे त्यांनाही खऱ्या अर्थाने इस्लामची ओळख पटली नाही. त्यांच्याविषयी प्रेमभाव निर्माण झाला नाही.

## सांप्रदायिक सद्भाव कसा निर्माण होईल ?

सांप्रदायिक सद्भाव निर्माण करायचा असेल तर, जगात सर्वसमावेशक अशा एखाद्या नव्या धर्माची उभारणी करणे शक्य आहे का? तर याचे उत्तर सकारात्मक भेटत नाही. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती आहेत; प्रकृती आहेत. इथे वेगवेगळ्या विचारधारा आहेत. वेगवेगळ्या प्रवृत्ती प्रवाहाचे लोक, वेगवेगळ्या संस्कृतीचे लोक शेकडो वर्षापासून इथे नांदत आहेत. सर्व विचारधारा एका तत्त्वाने बांधल्या जातील ही कल्पना वास्तव्यात उतरविणे तसे अवघड आहे. एखाद्या नव्या धर्माचे तत्त्वज्ञान, आचारविचार प्रणाली, उपासनापद्धती निर्माण करून ती अवघ्या विश्वाला स्वीकाराला लावणे ही गोष्ट अशक्य आहे. त्या संदर्भातील प्रयत्नही विफल ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याऐवजी सर्व धर्मातील लोककल्याणाची तत्वे समजून घेऊन सर्व धर्माचा आदर करणे ही सांप्रदायिक सद्भावना प्रत्येकाच्या मनात प्रज्वलित करण्याची नितांत आवश्यकता आहे. यासाठीच भारतातील सर्व संत, अवतारी पुरुषांनी सर्वधर्म संप्रदायाचा आदर राखणारा विचार प्रभावीपणे व्यक्त केलेला आहे. सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींनी 'वैरीयाचा देव झाला म्हणून काय, दगडे हाणून फोडावा' किंवा विश्वशांती निर्माण करण्यासाठी 'अहंतेचे मूळ सकंदी उपटावे, मग अंकुर निघती, मग शांतीचे रोप लावावे' असे म्हणून शांती निर्माण करण्यासाठी अहंकार नष्ट करावा लागेल. हा विचार त्यांनी दिला. संत ज्ञानेश्वरांनी चराचरसृष्टीतील सर्व प्राणीमात्रांना सुख प्राप्त होण्यासाठी विश्वात्मक देवाला पसायदान मागितले. संत तुकारामांनी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे' म्हणून विश्वचैतन्याचा साक्षात्कार घडविला. महात्मा ज्योतिराव फुले यांनी सर्व

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

धर्माच्या एकात्मतेसाठी विश्वकुटुंबाची संकल्पना मांडली. एकाच घरात राहणाऱ्या वेगवेगळ्या धर्माच्या व्यक्तींना प्रत्येकाने समजून घेऊन एकोप्याने कसे राहता येते. हा विचार त्यांनी पटवून देताना मतभेद असले तरी मनभेद असू नये हा विचार प्रभावीपणे मांडून सत्यधर्माचा पुरस्कार करण्यासाठी प्रवृत्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी विश्वधर्म सांगून वैश्विक शांतीचा विचार मनात पेरला. सर्व संत, विचारवंत, प्रतिभावंत, सुधारकांनी आजपर्यंत सर्वधर्मसमभावाचा विचार अत्यंत प्रभावीपणे मांडला. याचे कारणच सर्व धर्मातील लोकांनी परस्परांविषयी प्रेमभाव निर्माण करून या भारतभूमीमध्ये गुण्यागोविंदाने नांदावे आणि या भूमीवर स्वर्गसुखाचे नंदनवन निर्माण करावे. अशी त्यामागची भावना होती. धर्माच्या संदर्भात आपण विचार केला तर, प्रत्येक धर्मियांकडून त्याच्या धर्मग्रंथाप्रमाणे योग्य रीतीने त्या तत्त्वाचे पालन होतेच असे दिसून येत नाही. किंवा सर्वसामान्य लोकांना आपल्या धर्माच्या मूलभूत तत्वाविषयी माहिती असतेच असेही लक्षात येत नाही. त्यामुळे किमान इतरांच्या धर्मग्रंथाच्या अभ्यासाने सांप्रदायिक सद्भावाला चालना मिळू शकेल. यासाठी विद्यार्थीदशेपासून जर धर्मशिक्षण मिळाले तर भारतातील अनेक धर्मपंथाच्या उपासना पद्धती, आचार प्रणाली, विचार प्रणाली, विद्यार्थ्यांना माहीत होतील. त्याचा सामाजिक जीवनावर उत्तम परिणाम होईल. भारतात अनेक पंथ, संप्रदाय आहेत. त्याच्या धर्मतत्वाबद्दल त्यांच्यात एकवाक्यता नाही. त्यामुळे कधी कधी परस्परविरोधी टोकाचा विचार करण्यात येतो. यासाठीच धार्मिक शिक्षण दिले तर प्रमुख धर्मग्रंथातील मानवी संवर्धनासाठी आणि संरक्षणासाठी आवश्यक असणारे ज्ञान, आचारविचार प्रणाली, उपासना पद्धती याचे शिक्षण देऊन मूल्यधिष्टीत कृतीशीलतेच्या प्रेरणा निर्माण करण्यासाठी अभ्यासक्रमाची निर्मिती करणे आवश्यक आहे. पण अशाप्रकारचा अभ्यासक्रम करणे ही अत्यंत अवघड बाब असली तरी अशक्य नाही. तथापि अशा अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट हे विशिष्ट धर्मपंथाचा प्रसार, प्रचार अथवा पुरस्कार नसून मानवी जीवनातील धार्मिक प्रवृत्तींचा सांप्रदायिक सद्भाव आणि राष्ट्रीय शांतता निर्माण करण्याच्या दृष्टीने आवश्यक तेवढा परिचय करून देणे हाच असायला हवा. त्यानिमित्ताने भगवान गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, मोहम्मद पैगंबर, गुरुनानक, जरथूस्र इत्यादी विभूतिमत्त्वांच्या जीवनचरित्राचा तसेच संत कबीर, तुलसीदास, श्री चक्रधर स्वामी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, महात्मा बसवेश्वर इत्यादी संत महात्म्याच्या व्यापक कार्याची ओळख अभ्यासक्रमाच्या माध्यमातून करून देण्यात आली, सोबतच स्वामी विवेकानंद, महात्मा गांधींनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वधर्मसमभावासाठी जो तात्विक विचार मांडला त्याचा परिचय करून देण्यात आला तर विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर सांप्रदायिक सद्भावाचे बिजारोपण करता येणे शक्य होईल. आपल्या देशातील जनतेला परस्परांच्या धर्माची ओळख पटली तर सांप्रदायिक सदभावाच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल ठरेल. शाळा, महाविद्यालयातील धार्मिक शिक्षणाचे हे महत्त्वाचे उद्दिष्ट असेल तरच त्याची फलश्रुती योग्य होईल नाहीतर एखाद्या धर्माचे रंग अधिक गडद केले तर परस्पर भेद निर्माण होतील. यासाठी शिक्षणव्यवस्थेने दक्षता बाळगण्याची आवश्यकता असेल. धार्मिक सद्भाव वाढण्यासाठी धर्मतत्वाचे, त्यातील आचाराविचाराचे स्वरूप बदलविणे आवश्यक ठरते. आजही एकाच धर्मातील काही लोक कर्मकांडाचे रक्षण करताना दिसतात; तर त्याच धर्मातील सुधारक लोक धर्मसुधारण्याचे प्रयत्न करतात. धर्मसुधारकांच्या धर्मचौकटीबाहेर जाऊन विश्वकल्याणकारक विचारांमुळे नैतिक तत्वाच्या आधारावर एकात्म समाजाच्या निर्मितीची शक्यता बळावते. सांप्रदायिक सद्भाव यातूनही वाढीस लागतो. तसेच विशिष्ट जाती-धर्माच्या परिषदांच्या आयोजनाऐवजी सर्वधर्म परिषदेचे आयोजन केल्यास धर्मशास्त्राच्या तौलानिक अभ्यासामुळे ज्ञानकक्षा अधिक विस्तारित होऊन सर्व धर्माचे लोक एकत्रितपणे त्या धर्मातील मानव कल्याणाची तत्त्वे सामुदायिक रीतीने विचारात घेतील तर विश्वबंधुत्वाची भावना वाढीस लागेल. अशा परिषदांमधून परस्परांच्या धर्माविषयीच्या आदरभावानेला समतेचे स्थान द्यावे लागेल. हे आयोजन म्हणजेच सांप्रदायिक सद्भावाच्या दिशेने टाकलेले अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरेल. तसेच आजच्या काळात शासन व्यवहार, कायदा, शिक्षण आणि सामाजिक व्यवहार हे धर्मनिरपेक्ष असणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच धर्म व राजकारण यांच्यात समन्वय साधून सर्वकल्याणकारक नैतिक समाजनिर्मिती हेच राजकीय पक्षांचे खरे उद्दिष्ट असणे आवश्यक आहे. धार्मिक भावनांचा स्वार्थी राजकारणाशी संबंध जोडला तर शांतता नष्ट

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

होऊ शकते. तेव्हा सांप्रदायिक सद्भावासाठी केवळ कडक कायदे करून चालणार नाही तर; जात, वंश, धर्म, प्रदेश, भाषा यांच्याविषयी परस्परात असलेले स्वाभाविक प्रेम हे व्यक्तीसमूहाच्या नैतिक विकासाच्या अपेक्षेपोटी 'तया सत्कर्मी रती वाढो' या न्यायाने वाढीस लागण्याची गरज आहे. त्यासाठी आपल्याला संकुचित भावनेवर मात करून विश्वव्यापक व्हावे लागेल. विश्वकुटुंबवादाच्या तत्त्वातूनच मानवाच्या नैतिक विकासाच्या शक्यता निर्माण होतात. म्हणून आपल्या संकुचित भावनेवर मात करून अशा व्यापक, सर्वव्यापी, सामुदायिक आणि सार्वजनिक जीवन सुखकारक आणि मंगलकारक करणाऱ्या तत्त्वांची जोपासना करणे ही काळाची गरज आहे.

## संदर्भ ग्रंथसूची

महाराष्ट्र शब्दकोश, विभाग ७, महाराष्ट्र कोशमंडल पुणे, 1938
मे. पू. रेगे,गद्य, समाजपरिवर्तनाचे एक वाहन आणि साधन, नवभारत, औगस्ट, १९८१
फुले जोतिबा, महात्मा फुले समग्र वाङ्मय, महा. राज्य साहित्य संस्कृती मंडल, मुंबई, १९७९
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, ग्रामगीता, श्री गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज, १९५६
अक्षयकुमार काळे, सांप्रदायिक सद्भाव आणि सामाजिक शांतता, ग्लोबल हेल्थ केअर अँड एजुकेशनल फाऊंडेशन पुणे, २०११